9/c
373

# झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र,पुणे.

(गृहनिर्माण विभाग, महाराष्ट्र शासन)
चौथा मजला,काकडे बीझ् आयकॉन, ई-स्क्वेअरजवळ,
अशोकनगर, गणेशखिंड रोड, शिवाजी नगर, पुणे-४११०१६.
दूरध्वनी क्रमांक : (O) : ०२०-२५५७७९९९
ईमेल-: srapune@yahoo.in वेबसाईट: www.srapune.gov.in

---

जा.क्र.झो.पु.प्रा./तां.१/मा.क्र.४८/ १४८/२०२१ दि. २२/०१/२०२१.

## अंतिम भोगवटा प्रमाणपत्र

वाचा - १) इमारत बी साठी अंशत: भोगवटा प्रमाणपत्र जा.क्र.झोपुप्रा/तां.२/अंशत: इभोप्र/९८१/२०१८ दि.०१/०६/२०१८

२) विकसक यांचे विक्री घटक इमारत "B" साठी अंतिम भोगवटा प्रमाणपत्राची मागणी. (आ.क्र.M-१२८६ दि.०३/०६/२०२०)

---

महाराष्ट्र प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९, कलमे २५३/२५४ व महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ कलम ४५ प्रमाणे स.नं.११८/अ (पै), फा.प्लॉट क्र.५४३ (पै) टी.पी.स्कीम नं.३, पर्वती, पुणे येथील झोपडपट्टी पुनर्वसन योजनेमधील इमारतीस या कार्यालयाकडून जा.क्र.९५५/२०१८ दि.३१/०५/२०१८ अन्वये बांधकाम परवानगी देणेत आली आहे. सदरील बांधकाम परवानगी प्रमाणे इमारतीचे काम पूर्ण झाल्याने, उपरोक्त वाचा क्र.१ मध्ये नमूद केले नुसार इमारत बी साठी लोअर ग्राउड+अप्पर ग्राउंड+४ मजल्यापर्यंत अंशत: भोगवटा प्रमाणपत्र अदा करणेत आले आहे. सदर इमारतीमधील सदनिकांसाठी उर्वरीत पाच मजल्यांपर्यंत भोगवटा पत्र मिळण्याबाबत विकसक यांनी उपरोक्त वाचा क्र.२ मध्ये नमूद केले नुसार विनंती अर्ज केलेवरुन खालीलप्रमाणे तपशीलानुसार विक्री घटक इमारत "B" साठी अंतिम भोगवटा प्रमाणपत्र देणेत येत आहे.

इमारत "B" विक्री घटक

| अ.क्र. | मजले | सदनिका क्र. | सदनिका (विक्री घटक) | एकूण सदनिका |
|---|---|---|---|---|
| १) | पाचवा मजला | ५०१ ते ५०५ | ५०१,५०२,५०३,५०४,५०५ | ०५ सदनिका |
| २) | सहावा मजला | ६०१ ते ६०५ | ६०१,६०२,६०३,६०४,६०५ | ०५ सदनिका |
| ३) | सातवा मजला | ७०१ ते ७०५ + Refuge Area | ७०१,७०२,७०३,७०४,७०५ | ०५ सदनिका + Refuge Area |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ४) | आठवा मजला | ८०१ ते ८०५ | ८०१,८०२,८०३,८०४, (duplex) ८०५ | ०४ सदनिका + १ duplex |
| ५) | नववा मजला | ९०१ ते ९०३ व ९०५ | ९०१,९०२,९०३,९०५ | ०४ सदनिका |
| एकूण | | | २३ + १ duplex | २३ + १ duplex |

**विक्री इमारत**

निवासी सदनिका - २३ सदनिका + १ duplex

एकूण - २३ सदनिका + १ duplex

**अटी :-**

१) प्रस्तुत बांधकाम भोगवटा प्रमाणपत्र प्राप्त झालेनंतर सदर इमारतीमध्ये वा भूखंडामध्ये केलेले कोणतेही बांधकाम अनाधिकृत समजण्यात येईल आणि त्या बाबत महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६चे कलम ५२ ते ५६ नुसार जरूर ती कार्यवाही करण्यात येईल.

२) बांधकाम भोगवटा प्रमाणपत्रासाठी सादर केलेली कागदपत्रे चुकीची अथवा दिशाभूल करणारी असल्याचे भविष्यात कोणत्याही वेळेस आढळल्यास दिलेले बांधकाम भोगवटा प्रमाणपत्र आपोआप रद्द समजण्यात येईल.

३) प्रकरणी भविष्यात कोणतीही शासकीय देणी / येणे देय असल्याबाबत आढळून आल्यास अगर विविध देय शुल्कांच्या परिगणनेमध्ये तफावत आढळून आल्यास त्याप्रमाणे फरकाची रक्कम भरणे विकसकावर बंधनकारक राहील.

४) स्थानिक संस्था कराबाबत व उपकराबाबत शासन धोरण व नियमानुसार आवश्यक ती पूर्तता करणे व सर्व अटी / शर्तींचे पालन करणे विकसकांवर बंधनकारक राहील.

२ प्रति मिळाल्या
पवार शिंदे
२२।१।२१

२२/१/२०२१

प्र.सहाय्यक संचालक नगररचना
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,
पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र, पुणे.

o/c
२२/०१
२२/०१

**प्रत :- १) विकसक मे. नाकोडा कन्स्ट्रक्शन्स**
अशोक विजय कॉम्प्लेक्स,
३२६, एम.जी.रोड, पुणे ०१

**२) वास्तुविशारद ओंकार असोसिएट्स**
२, तृप्ती अपार्टमेंट, भांडारकर रोड, पुणे.

**३) संगणक अधिकारी,** झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे, यांना संकेतस्थळावर उपलब्ध करणेसाठी

d:\technical-harshada\harshada\math sir\५४३ पर्वती, पुणे\अंतिम भोगवटा प्रमाणपत्र.docx